नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल®
सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७७। किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.)
गुरूवार ११/११/२०२६ पाने - ६

फराळ, फटाके जिकडे तिकडे.
दिवाळी म्हणजे राजेन्द्रचे कपडे
दिवाळी आली, चला 'राजेन्द्र'मध्ये!
खास दिवाळीसाठी असंख्य व्हरायटीज.
१९५९ पासून राजेन्द्र
क्लॉथ स्टोअर्स
मेन रोड, संगमनेर.
फोन : 02425-225740, 79010 31155

वाळूतस्करांविरुद्ध महसूल विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

चार ठिकाणी धडक कारवाई; ५० जणांवर गुन्हे, १२ वाहने जप्त


११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : दिवाळीच्या सुट्ट्यांचा फायदा उठवत प्रवरा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीचा धुमाकूळ घालणाऱ्या वाळूतस्करांना संगमनेरच्या महसूल विभागाने जोरदार दणका दिला आहे. तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली महसूल पथकांनी संगमनेर खुर्द, रहिमपूर आणि साकूर परिसरात सलग दोन दिवस धडक कारवाया करत वाळूतस्करांचे धाबे दणाणले आहेत. या मोहिमेत चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे ५० जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. दोन जेसीबी, ट्रॅक्टर, पिकअपसह एकूण १२ वाहनांवर कारवाई करत तब्बल ११ लाख ९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांतील महसूल विभागाची ही मोठी कारवाई मानली जात आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे काही अधिकारी आणि कर्मचारी रजेवर असल्याची संधी साधत वाळूतस्करांनी प्रवरा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन सुरू केले होते. नदीपात्राची अक्षरशः लूट सुरू असताना शासनाचा महसूल बुडविण्याबरोबरच पर्यावरणाचेही मोठे नुकसान केले जात होते. या प्रकाराची गंभीर दखल घेत राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शनिवारच्या जनता दरबारात अवैध वाळू उपशाविरोधात कठोर कारवाईचे निर्देश दिले होते. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आढावा बैठकीतही संबंधित यंत्रणांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानंतर तहसीलदार धीरज मांजरे यांनी महसूल पथकांना सक्रिय करत वाळूतस्करांविरोधात कारवाईची मोहीम हाती घेतली.

संगमनेर खुर्दमध्ये १८० ब्रास वाळूसाठा; दोन जेसीबी जप्त

संगमनेर खुर्द येथील छोट्या पुलाजवळ गंगामाई घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पश्चिम बाजूस सोमवारी (१६ नोव्हेंबर) रात्री सुमारे ११ वाजता महसूल पथकाने छापा टाकला. यावेळी अंदाजे १८० ब्रास अवैध वाळूसाठा आणि दोन जेसीबी यंत्रे आढळून आली. या प्रकरणी पाच व्यक्तींविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत तहसीलदार धीरज मांजरे, मंडळ अधिकारी विश्वजित चौगुले, ग्राम महसूल अधिकारी पारधी, संतोष लंके, आशुतोष वाकडे, गणेश सोनवणे, पांडुरंग भुरे यांच्यासह महसूल सेवक आणि संबंधित गावचे पोलीस पाटील सहभागी झाले होते.

रहिमपूर परिसरात मंगळवारी (१७ नोव्हेंबर) पहाटेपासूनच महसूल विभागाने कारवाई सुरू केली. तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पहाटे ५.५५ वाजता मोहिमेला सुरुवात केली. रहिमपूर-मोनोली रस्त्यावर सकाळी सुमारे सात वाजता विनानोंदणी क्रमांकाची टाटा पिकअप थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने महसूल विभागाच्या वाहनाला धडक देण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, वाळूने भरलेले जेनॉन वाहन थांबवण्याचा प्रयत्न करताना संबंधित वाहनाने तहसीलदारांच्या वाहनाला कट मारून घटनास्थळावरून पलायन केले. शासकीय पथकाच्या वाहनांना धडक देण्याचा प्रयत्न करूनही तस्कर पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी बाळकृष्ण विक्रम साळवे यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात सौरभ बन्सी गुडवे, विशाल नानासाहेब गुडवे आणि युवराज दिलीप वाळुंज या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(पान २ वर)

रुग्णवाहिकेतच मिळणार ICU दर्जाचे उपचार

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची घोषणा



मुंबई (वृत्तसंस्था)

रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे वाहतूक कोंडीत अडकल्याने २० महिन्यांच्या चिमुकल्याचा रुग्णवाहिकेतच मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर राज्य सरकारने आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. राज्यात येत्या २ तारखेपासून अद्ययावत अशा 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' संकल्पनेवर आधारित नव्या १०८ रुग्णवाहिका सेवेचा शुभारंभ मुंबईतून केला जाणार असून, पहिल्या टप्प्यात ३०० नव्या सुसज्ज रुग्णवाहिका ताफ्यात दाखल होणार आहेत, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. बुधवारी नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील रुग्णालयांचे वार्षिक फायर ऑडिट, नागपूर जिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण, बोगस डॉक्टर प्रकरण आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आरोग्य विभागाच्या उपाययोजनांवर सविस्तर भाष्य केले.

अलिबागमधील दुर्दैवी घटनेवर तीव्र दुःख व्यक्त करताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, २०१३-१४ च्या दरम्यान राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली होती. आता नव्या निविदा प्रक्रियेद्वारे ही सेवा अधिक अद्ययावत केली जात आहे. नव्या रुग्णवाहिकांमध्ये 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' ही संकल्पना राबवली जाणार आहे. रुग्णवाहिकेत रुग्णाला घेतल्याक्षणीच तिथे आयसीयू बेडच्या धर्तीवर डॉक्टर्स आणि अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रणेमार्फत तात्काळ उपचार सुरू होतील. येत्या २ तारखेला मुंबईत या अद्ययावत १०८ सेवेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण होणार असून, ३०० नव्या रुग्णवाहिका सेवेत दाखल होतील.सार्वजनिक आरोग्य विभागाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी राज्यभरात 'आरोग्य संवाद यात्रा' सुरू करण्यात आली असून, याअंतर्गत आपण वर्धा आणि भंडारा जिल्ह्यांच्या २ दिवसीय दौऱ्यावर आलो आहोत. तसेच 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कट'च्या संदर्भात डॉक्टरांसोबत महत्त्वाची बैठक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भंडारा आणि अमरावती येथील रुग्णालयांमध्ये घडलेल्या आगीच्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने कडक पावले उचलली आहेत. अमरावती घटनेतील दोषी यंत्रणेवर कारवाई करण्यासोबतच संबंधित कंपनीला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात आले आहे. तसेच, खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमधील व्हेंटिलेटरच्या वापराबाबत स्वतंत्र कार्यप्रणाली (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे.

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

दिपावली धमाका ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
25% सूट
ऑफर कालावधी : 5 ते 30 नोव्हेंबर 2026
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्स
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर ☎ ०२४२५ - २२३८६२ ७५८८२ ४९८४९

अहिल्यानगर जिल्ह्यात चारा वाहतुकीवर दोन महिने बंदी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश!



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे चारा साठा कमी होत असल्याने पशुधनाच्या चार्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात उत्पादित होणारा हिरवा व कोरडा चारा, मुरघास तसेच टोटल मिक्स रेशन (टीएमआर) जिल्ह्याबाहेर वाहतूक करण्यास पुढील दोन महिन्यांसाठी बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी १६ नोव्हेंबर रोजी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यात सध्या दुष्काळामुळे सर्व तालुक्यांमध्ये चारा उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्ह्यातील पशुधनाची एकूण संख्या २६ लाख १५ हजार ७०६ इतकी आहे. या पशुधनासाठी चारा टंचाईच्या निकषानुसार दरमहा सुमारे ८ लाख ९५ हजार २४३ मेट्रिक टन चार्याची आवश्यकता आहे. खरीप हंगामातील पेरणीनुसार ४ लाख ५४ हजार १८९ मेट्रिक टन चारा उत्पादन झाले आहे. मात्र, उपलब्ध चारा साठा आणि पशुधनाची गरज यामध्ये मोठी

(पान ४ वर)

सणासुदीत
सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50%* पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने ल्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा राजपाल

दिवाळी पाडवा निमित्त
सोने खरेदीची उत्तम संधी
आता मजुरी फक्त 4% पासुन सुरुवात
*नियम आणि अटी लागू
सर्व दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
मे. पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

बुवाबाजी विरोधात मुंबईत राज्यस्तरीय महिला परिषद

खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते उद्घाटन अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, अनिता दाते यांची उपस्थिती

मुंबई (वृत्तसंस्था)

अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि महिलांचे होणारे शोषण याविरोधात जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ही परिषद पार पडणार आहे. या परिषदेला राज्यभरातून ५०० हून अधिक महिला व पुरुष उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे आणि राज्य कार्यवाह ॲड. रंजना



पगार-गवांदे यांनी दिली.

या परिषदेचे उद्घाटन खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते होणार असून, सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे असतील. परिषदेच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांचे 'बुवाबाजी : बळी स्त्रियांचा, एक मानसशास्त्रीय विश्लेषण' या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुवाबाजीच्या माध्यमातून महिलांची होणारी फसवणूक, मानसिक शोषण आणि त्यामागील मानसशास्त्रीय कारणांचा वेध या व्याख्यानातून घेतला जाणार आहे.

तिसऱ्या सत्रात 'जेन-झी टॉक ऑन बुवाबाजी' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये प्रियांका खेडेकर, हरी आवळे, शितल वसावे आणि गौरी जाधव हे तरुण कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. नव्या पिढीचा बुवाबाजीविरोधी लढ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि तरुणांची भूमिका यावर या परिसंवादात चर्चा होणार आहे.

परिषदेच्या समारोप सत्राला ज्येष्ठ साहित्यिका प्रा. नीरजा आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे असतील.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेल्या ३७ वर्षांपासून अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यापक सामाजिक परिवर्तनासाठी संघटितपणे कार्यरत आहे. संघटनेने सुरुवातीपासूनच बुवाबाजी, भोंदूगिरी आणि त्यातून होणाऱ्या शोषणाविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीने पुढाकार घेत आतापर्यंत १,५०० हून अधिक गुन्हे दाखल करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यातील काही भोंदू बुवा, बाबा आणि मांत्रिकांना या कायद्यांतर्गत शिक्षाही झाली आहे. या परिषदेच्या नियोजनासाठी समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, सहकार्यवाह विष्णू लोणारे, महिला सहभाग विभागाच्या राज्य कार्यवाह गायत्री आडे तसेच रुपेश शोभा विशेष प्रयत्न करीत आहेत. महिलांचे शोषण करणाऱ्या बुवाबाजीविरोधात व्यापक जनजागृती निर्माण करणे, महिलांना जागरूक व सक्षम बनवणे आणि तरुण पिढीला विवेकवादी विचारांची जोड देणे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे ही परिषद अंधश्रद्धाविरोधी चळवळीला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

बोगस पटसंख्या प्रकरणात पहिली कारवाई

गुहा शाळेचे मुख्याध्यापक निलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील कथित वा बोगस विद्यार्थी नोंदणी आणि पटसंख्या फेरफार प्रकरणात प्रशासनाने अखेर पहिली कारवाई केली आहे. गुहा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अन्सार गुलाब पठाण यांना निलंबित करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने मंगळवारी (१७ नोव्हेंबर) त्यांच्या निलंबनाचा आदेश बजावला.

चौकशीत पठाण यांनी प्रत्यक्ष उपस्थित नसलेल्या विद्यार्थ्यांची बोगस हजेरी लावणे, शाळेत शिक्षण न घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे दाखले नोंदविणे,



हजेरीपटावर खोटी माहिती भरणे, शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना न करणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी न करणे, वरिष्ठांशी उद्धट वर्तन आणि दप्तर तपासणीस नकार देणे, असे आरोप निलंबन आदेशात. नमूद आहेत. निलंबन काळात त्यांना नेवासा पंचायत समितीत हजेरी लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शिक्षकांची अतिरिक्त पदे वाचविण्यासाठी काही शाळांनी अन्य शाळांतील विद्यार्थ्यांचे दाखले स्वतःकडे दाखवून पटसंख्या वाढविल्याचा संशय आहे. सामाजिक कार्यकर्ते अरुण वाबळे यांनी माहिती अधिकारातून हा प्रकार उघडकीस आणला, त्यानंतर गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन हजेरीपट, प्रवेश नोंदी आणि परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी केली. काही ठिकाणी खाडाखोड, पाने फाडून पुन्हा चिकटविणे आणि प्रत्यक्ष उपस्थितीतील तफावत आढळल्याचे सांगण्यात आले.

पान १ वरून

वाळूतस्करांविरुद्ध ...

रहिमपूर येथील बंधाऱ्याजवळ प्रवरा नदीपात्रात महसूल पथकाने पाहणी केली असता तब्बल ३८० ते ४०० ब्रास वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळी तीन टाटा पिकअप आणि एक ट्रॅक्टर आढळून आले. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी प्रवीण गजानन ढोले यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात सात नामनिर्दिष्ट व्यक्तींसह २५ ते ३० अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये सौरभ बन्सी गुडवे, विशाल नानासाहेब गुडवे, दत्तात्रय सुखदेव शिंदे, अक्षय भाऊसाहेब गुडवे, अमोल बाळासाहेब मोरे, सुनील लक्ष्मण पाटोळे आणि युवराज दिलीप वाळुंज यांचा समावेश आहे. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी प्रवीण ढोले, बाळकृष्ण साळवे, राजेंद्र खेमनर, ओमप्रकाश गाडेकर आणि महसूल सेवक अश्विनी पुंडुक गाडेकर यांनी सहभाग घेतला.

साकूर-मांडवे रस्त्यावर वाळू वाहतुकीचा ट्रॅक्टर पकडला

साकूर-मांडवे रस्त्यावर मंगळवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने पकडला. हा ट्रॅक्टर पुढील कारवाईसाठी घारगाव पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला. याप्रकरणी साकूरचे ग्राम महसूल अधिकारी सोमनाथ शेरमाळे यांनी ट्रॅक्टरमालक अजहर रफीक पाटील आणि चालक अमित रावसाहेब कांबळे यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. या कारवाईत नायब तहसीलदार संदीप भांगरे, महसूल सहाय्यक पिराजी भडकवाड आणि वाहनचालक राजेश गुंजाळ सहभागी झाले होते.

वाळूतस्करांना स्पष्ट इशारा; कारवाईची मोहीम सुरूच राहणार!

संगमनेर खुर्द, रहिमपूर आणि साकूर परिसरात झालेल्या या चार स्वतंत्र कारवायांमुळे अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सुमारे ५० जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन जेसीबी, पिकअप, ट्रॅक्टरसह एकूण १२ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. या संपूर्ण मोहिमेत ११ लाख ९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, शासनाचा महसूल बुडवून नैसर्गिक संपत्तीची लूट करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात महसूल विभागाची धडक मोहीम यापुढेही सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा तहसीलदार धीरज मांजरे यांनी दिला आहे. त्यामुळे प्रवरा नदीपात्रातील वाळूतस्करीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाची ही मोहीम कितपत प्रभावी ठरते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

पावसाने पाठ फिरवताच जिल्ह्यात पाणी टंचाईचा भीषण उद्रेक

१६ दिवसांत टँकरची संख्या तिपटीहून अधिक; साडेपाच लाख नागरिकांची तहान टँकरवर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - यंदा मान्सूनसह परतीच्या पावसानेही पाठ फिरवल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले आहे. पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान झाले असून, आता पाणी आणि चाऱ्याच्या टंचाईचे संकट पशुधनाच्या जगण्यावरही घाला घालू लागले आहे. हिरवा चारा मिळणे दुरापास्त झाल्याने जनावरांना उपलब्ध होईल ते खाऊन भूक भागवावी लागत आहे. एकीकडे पाण्यासाठी भटकंती, तर दुसरीकडे चाऱ्याचा अभाव अशा दुहेरी संकटात ग्रामीण भागातील शेतकरी आणि त्यांचे पशुधन सापडले आहे. विशेष म्हणजे, ऐन नोव्हेंबर महिन्यातच जिल्ह्यातील पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले असून, गेल्या अवघ्या ९६



दिवसांत टँकरच्या संख्येत तिपटीहून अधिक वाढ झाली आहे.

१२ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात केवळ १०० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. मात्र, १६ नोव्हेंबरपर्यंत ही संख्या थेट ३१४ वर पोहोचली आहे. अवघ्या ९६ दिवसांत तब्बल २१४ टँकरची भर पडली असून, बाधित गावांची संख्या ९८ वरून २७२ वर, तर पाणीटंचाईने बाधित नागरिकांची संख्या १ लाख ९५ हजारांवरून तब्बल ५ लाख ५१ हजारांवर पोहोचली आहे. या आकडेवारीवरून जिल्ह्यातील दुष्काळाची तीव्रता किती वेगाने वाढत आहे, हे स्पष्ट होते.

१२ ऑगस्टला जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधील ९८ गावे आणि ५०९ वाड्या-वस्त्यांतील १ लाख ९५ हजार ३२१ नागरिकांना १०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. त्यानंतर पाणीटंचाईचा आलेख सातत्याने चढत गेला. अवघ्या ७० दिवसांत, म्हणजेच २१ ऑक्टोबरपर्यंत टँकरची संख्या दुप्पट होऊन २०० वर पोहोचली. त्यावेळी बाधित गावांची संख्या १९१ झाली होती. मात्र, त्यानंतरच्या अवघ्या २६ दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर झाली. या काळात ११४ नवीन टँकर सुरू झाल्याने १६ नोव्हेंबरपर्यंत एकूण टँकरची संख्या ३१४ झाली.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील २७२ गावे आणि १ हजार ६२९ वाड्या-वस्त्यांमधील ५ लाख ५१ हजार ४८२ नागरिकांची तहान टँकरच्या पाण्यावर भागवली जात आहे. विशेष म्हणजे, ही परिस्थिती नोव्हेंबर महिन्यातच निर्माण झाली असून, पुढील उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट आणखी भयावह होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

टँकरची संख्या वाढत असतानाच मंजूर खेपा आणि प्रत्यक्ष होणाऱ्या खेपांमधील तफावतही चिंतेचा विषय बनली आहे. ऑगस्ट महिन्यात दररोज १९३.५ खेपा मंजूर असताना त्यापैकी १९ खेपा होत नव्हत्या. नोव्हेंबरमध्ये ही परिस्थिती अधिक गंभीर झाली असून, दररोजच्या ६१५ मंजूर खेपांपैकी तब्बल ५४ खेपा रखडत आहेत. त्यामुळे टँकर मंजूर असूनही अनेक गावांतील नागरिकांना वेळेवर पाणी मिळण्यात अडचणी येत आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत असून, ग्रामीण भागातील महिलांचे आणि शेतकऱ्यांचे हाल वाढले आहेत.

पाण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू असतानाच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. त्यामुळे केवळ टँकरची संख्या वाढवून चालणार नाही, तर मंजूर खेपांचा नियमित पुरवठा, पाणी उपलब्धतेचे योग्य नियोजन, चारा छावण्यांची पूर्वतयारी आणि पशुधनासाठी चारा-पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक बनले आहे.

४०० टँकरचा टप्पा ओलांडण्याची शक्यता!

ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमधील अवघ्या २६ दिवसांत ११४ टँकर वाढल्याने आगामी काळातील पाणीटंचाईचे संकट किती गंभीर असेल, याची कल्पना येते. डिसेंबर महिन्यातच जिल्ह्यातील टँकरची संख्या ४०० च्या पुढे जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तर मे-जून महिन्यात ही संख्या एक हजाराच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रिझर्व्ह बँकेचा दणका! एका झटक्यात ६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द

भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील फायनान्स क्षेत्रात मोठी आणि धडक कारवाई करत एकाच झटक्यात तब्बल ६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द केले आहेत. १६ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेद्वारे ठख ने ही माहिती दिली आहे. या कारवाईअंतर्गत ४९ नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्यांचे परवाने थेट रद्द करण्यात आले असून, हे आदेश १ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर दरम्यान पारित करण्यात आले होते. याशिवाय १३ एनबीएफसी आणि १ हाऊसिंग फायनान्स कंपनीने स्वतःहून आपले रजिस्ट्रेशन परत केले आहे. स्वतःहून परवाना परत करणाऱ्या कंपन्या : एकूण १४ कंपन्यांनी वेगवेगळ्या कारणांमुळे आपले रजिस्ट्रेशन परत केले. यापैकी ६ कंपन्यांनी छझ्रऊ चा व्यवसाय बंद केला होता, ५ कंपन्यांना आता रजिस्ट्रेशनची आवश्यकता उरली नव्हती, तर ३ कंपन्यांचे विलीनीकरण झाल्यामुळे किंवा त्या बंद पडल्यामुळे त्यांचे परवाने रद्द झाले.

भारतीय बौद्ध महासभेचे सरसेनापती

डॉ. भीमराव आंबेडकर यांचे संगमनेरमध्ये स्वागत!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय बौद्ध महासभेचे ट्रस्टी तथा सरसेनापती डॉ. ॲड. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी संगमनेर नगरीत आगमन झाले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने तसेच संगमनेरकरांच्या वतीने त्यांचे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात भव्य स्वागत करण्यात आले. संगमनेर येथील सिद्धार्थ विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित स्वागत समारंभाला बौद्ध अनुयायी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित अनुयायांना मार्गदर्शन करताना डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची शिकवण, भगवान गौतम बुद्धांचे विचार आणि तथागतांनी दिलेला समतेचा, करुणेचा व बंधुत्वाचा संदेश समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार अधिक व्यापक करण्यासाठी सर्वांनी संघटितपणे कार्य करण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर अशोकराव गायकवाड आणि राजेंद्र मुनतोडे यांनी त्रिशरण, पंचशील व सामूहिक बौद्ध वंदना घेतली. यामुळे संपूर्ण परिसर बुद्धमय वातावरणाने भारावून गेला होता.

डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे स्वागत संगमनेरचे शहराध्यक्ष विनय घोसाळे, दिलीप भोरुंडे, सचिन साळवे आणि डॉ. रवींद्र घोसाळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदासाठी दिलीप भोरुंडे यांचे नाव सुचविण्यात आले, तर पी. एस. रोकडे यांनी त्यास अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश राजू मंतोडे यांनी केले. अशोकराव गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या स्वागत समारंभाला भारतीय बौद्ध महासभेचे ट्रस्टी व राष्ट्रीय उपाध्यक्ष के. एस. के. भंडारे, राज्य संघटक प्रभारी गौरव पवार, उपाध्यक्ष आशिष त्रिभुवन, गौतम पगारे, शांताराम रणशूर आणि नरेंद्र पवार यांच्यासह महासभेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

याशिवाय प्राचार्य रघुनाथ जगताप, डॉ. रवींद्र घोसाळे, पी. एस. रोकडे, अशोकराव केदारे, विश्वास जमधडे, अमोल कदम, के. जी. भालेराव, योगेश रुपवते, नानासाहेब अहिरे, विजय घोसाळे, सतीश भालेराव, के. एस. गायकवाड, ए. पी. बनसोडे, राजेंद्र भालेराव, बाबासाहेब गायकवाड, संजय गायकवाड, अनिल गायकवाड, अशोकराव दिवे, बौद्धाचार्य रावसाहेब पराड, रमेश रुपवते, माणिक यादव, बंटीभाऊ यादव पाटील, शिला भालेराव, रघुनाथ भालेराव, एकनाथ मेढे, सिद्धू सोनवणे, दीपक तपासे, गौतम मिसाळ, विनोद गायकवाड, रघु गायकवाड, संजय भालेराव, शिलाताई खरात, शिला रुपवते, शैला भालेराव, शैला मिसाळ आदींसह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर यांच्या आगमनामुळे संगमनेरमधील बौद्ध अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्वागत समारंभाच्या माध्यमातून संघटनात्मक एकजूट आणि बौद्ध विचारांच्या प्रसाराचा संदेश देण्यात आला.

सोनिया गांधींच्या पुस्तकातून उलगडले भावविश्व- माजी मंत्री थोरात

सोनिया गांधी व्यक्तिमत्त्वाची प्रेरणादायी बाजू समजून घेण्यासाठी प्रत्येकाने पुस्तक वाचावे

युवावार्ता(प्रतिनिधी):

संगमनेर- काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या खासदार श्रीमती सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या 'बिलॉगिंग :अ जर्नी ऑफ लव्ह' पुस्तकातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, भावविश्वाची व जीवनप्रवासाची वेगळीच ओळख होत असल्याची भावना काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी प्रांताध्यक्ष व महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली.

श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या पुस्तकाबाबत बोलताना काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, हे पुस्तक हातात आल्यानंतर ते खाली ठेवावेसे वाटत नसल्याचा अनुभव त्यांनी आवर्जून सांगितला असून, सोनिया गांधींचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या स्वतःच्या शब्दांतून समजून घेण्याची ही एक अत्यंत सुंदर संधी आहे. त्यानी आपल्या आयुष्यातील विविध प्रसंग प्रामाणिकपणे व मनमोकळेपणाने या पुस्तकात मांडले आहेत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्तकडे



पाहण्याचा एक नवीन आणि वेगळा दृष्टिकोन मिळतो, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी नमूद केले. भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी यांच्यावरील त्यांचे प्रेम, त्या नात्यातील उत्कटता, भावनिक गुंतवणूक व त्यातून त्यांच्या मनात निर्माण झालेली घालमेल या साऱ्या गोष्टी पुस्तकातून प्रभावीपणे उलगडत जातात. देशाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा नवा विचार देणारे राजीव गांधी यांच्याशी विवाह झाल्यानंतर भारतात येण्याचा घेतलेला निर्णय हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. गांधी कुटुंबाची सून म्हणून नव्या आयुष्याला सुरुवात करताना त्यांच्यासमोर अनेक आव्हाने होती. वेगळे सामाजिक वातावरण, वेगळी संस्कृती आणि परंपरा यांच्याशी जुळवून घेताना त्यांना ज्या संघर्षातून जावे लागले, त्याचा प्रवास या पुस्तकातून समोर येतो. भारतीय संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धतीशी सोनिया गांधी ज्या सहजतेने एकरूप झाल्या, त्याविषयी आजवर अनेकांनी ऐकले आहे. मात्र, हे सर्व अनुभव घेत असताना त्यांच्या मनात नेमके काय विचार सुरू होते आणि त्यांनी परिस्थितीशी कसा समन्वय साधला, हे त्यांच्याच शब्दांत वाचणे हा एक वेगळाच अनुभव असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले. हे पुस्तक केवळ एका राजकीय व्यक्तिमत्त्वाचे आत्मकथन नसून प्रेम, नातेसंबंध, त्याग, संघर्ष आणि नव्या संस्कृतीचा स्वीकार अशा विविध पैलूंवर प्रकाश टाकणारा एक प्रेरणादायी जीवनप्रवास ठरतो. आपले राजकीय विचार कोणतेही असोत, सोनिया गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची ही प्रेरणादायी बाजू समजून घेण्यासाठी प्रत्येकाने हे पुस्तक नक्की वाचायला हवे, असे आवाहन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. याचबरोबर पुस्तक पूर्ण वाचून झाल्यानंतर याबाबत सविस्तर लिहीन असेही लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

श्रीमती सोनिया गांधी यांनी त्यांच्या बिलॉंगिंग: अ जर्नी ऑफ लव या पुस्तकांमधून त्यांचा जीवन प्रवास मांडला आहे अत्यंत प्रामाणिकपणे आणि मन मोकळेपणाने या पुस्तकात त्यांनी पूर्ण मांडणी केली असून त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांमध्ये त्यांच्या मनामध्ये झालेली घालमेल त्यांनी व्यक्त केलेली आहे हे पुस्तक नक्कीच तरुण पिढीसाठी आणि राजकीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरणारे असल्याचे संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दुग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले

॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

ताज पंचतारांकित हॉटेलच्या उभारणीमुळे शिर्डीच्या पर्यटनला नवी दिशा

महाराष्ट्र शासनाचा ताज समूहासोबत सामंजस्य करार

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी : शिर्डी विमानतळ परिसरातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने पंचतारांकित हॉटेल विकसित करण्यात येणार आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि दी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड (ताज समूह) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रालयात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे शिर्डी विमानतळ परिसरात विमान प्रवाशांसह देश-विदेशातून येणाऱ्या साईभक्तांना दर्जेदार निवास आणि आदरातिथ्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या सामंजस्य करार प्रसंगी



वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ आहे.श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक येथे येत असतात. शिर्डी विमानतळामुळे या भागाची हवाई कनेक्टिव्हिटी वाढली असून, विमानतळाच्या परिसरात जागतिक दर्जाच्या सुविधा प्रकल्पांच्या माध्यमातून पर्यटनवाढीसोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि रोजगारनिर्मितीलाही हातभार लागेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच शिर्डी विमानतळाच्या विकासामुळे शिर्डीच्या धार्मिक पर्यटनाला आणि परिसराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याने शिर्डी विमानतळाच्या कामालाही अधिक गती द्यावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर आणि दी इंडियन हॉटेल्स कंपनी लि, ताज समूहाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी टाटा समूह आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला शुभेच्छा देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ताज समूहासारख्या नामांकित हॉटेल उद्योगसमूहाच्या सहभागामुळे शिर्डी विमानतळासह परिसराच्या विकासाला चालना मिळेल. या विकसित होईल व पंचतारांकित हॉटेलच्या उभारणीमुळे शिर्डीच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल.

बॅनरबाजी थांबवा, आधी विकासकामे दाखवा!

माजी तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष आनंद वर्पे यांचा आ. खताळांना सवाल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात सध्या प्रत्यक्ष विकासकामांपेक्षा गावोगावी बॅनरबाजी करून विकास झाल्याचे आभासी चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आमदार अमोल खताळ यांनी या दिखाऊपणातून बाहेर पडून प्रत्यक्ष विकासकामांवर लक्ष केंद्रित करावे, असा सडेतोड सल्ला माजी तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष आनंद वर्पे यांनी दिला आहे. माजी आमदार बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या विकासकामांवर स्वतःच्या नावाचे लेबल लावून श्रेय लाटण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप वर्पे यांनी केला. तसेच पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या दूरदृष्टीतून आणि



प्रयत्नांतून सुरू असलेल्या कामांचेही श्रेय स्वतःकडे घेऊन टेंभा मिरवणे थांबवावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

वडगावपानमधील सिड हल्ल्याचा आरोपी अजूनही मोकाट असल्याचा मुद्दा उपस्थित करताना केवळ भाषणबाजी आणि आश्वासनांपेक्षा कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर ठोस कृती करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. गावोगावी आश्वासित करण्यात आलेले रस्ते अखेरची घटका मोजत आहेत. दुष्काळी परिस्थितीत वीज आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना चारा छावण्यांची अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. अशा परिस्थितीत मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही त्यांनी केली.

तालुक्यातील जनतेला रस्ते, पाणी, वीज, शेती आणि रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर उत्तर हवे आहे. मात्र, विकासाच्या प्रश्नांऐवजी जिरवाजिरवीचे राजकारण, कार्यक्रमबाजी आणि 'बघून घेतो', 'बंदोबस्त करतो' अशा पोकळ धमक्यांतून जनतेचे मनोरंजन करण्याचा प्रकार सुरू असल्याचा टोला वर्पे यांनी लगावला.

आमदारांनी वेळीच आत्मपरीक्षण करून हमरीतुमरीच्या राजकारणापेक्षा विकासात्मक आणि सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारावा. लोकशाहीत जनतेच्या निर्णयाचा आदर ठेवून लोकांच्या अपेक्षांनुसार काम करावे. विरोधकांशी संघर्ष करण्यापेक्षा तालुक्याच्या विकासासाठी निधी आणणे आणि मंजूर कामे मार्गी लावणे याला प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.बाकी राजकीय लढाई २०२९ मध्ये होईलच; मात्र तोपर्यंतचा काळ हा बॅनरबाजी, श्रेयवाद आणि राजकीय कुरघोड्यांमध्ये वाया न घालवता निधी, विकासकामे आणि संगमनेर तालुक्याच्या प्रगतीसाठी वापरावा. राजकारण निवडणुकीपुरते आणि विकास जनतेसाठी असतो, याचे भान आमदारांनी ठेवावे, असा मोलाचा सल्ला आनंद वर्पे यांनी दिला.

राज्यातील धरणांमध्ये ६३.७८ टक्केच पाणीसाठा

मराठवाड्याची स्थिती चिंताजनक, पुढील दहा महिने काटकसरीचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राज्यातील प्रमुख ३ हजार ४२ मोठ्या, मध्यम व लघु धरणांमध्ये १७ नोव्हेंबर २०२६ अखेर केवळ ६३.७८ टक्के म्हणजेच ९२३.७४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी याच दिवशी हा साठा ९०.४६ टक्के होता. त्यामुळे यंदा तब्बल ३८६.४१ टीएमसी पाणीसाठा कमी असून आगामी उन्हाळा आणि पावसाळ्यापूर्वीचा कालावधी लक्षात घेता पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. विशेषत: मराठवाड्यातील ३५.९१ टक्के पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक असल्याचे जलसंपत्ती अभ्यासक तथा निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी स्पष्ट केले. राज्यातील सहा महसुली विभागांपैकी कोकणात सर्वाधिक ८१.२३ टक्के, पुणे विभागात ७४.५१ टक्के, नाशिक विभागात ७३.८० टक्के, नागपूर विभागात ५५.८१ टक्के, अमरावती विभागात ५२ टक्के, तर मराठवाड्यात सर्वांत कमी ३५.९१ टक्के पाणीसाठा आहे. नागपूर आणि अमरावती विभागांमध्येही सरासरी ५३.९० टक्केच पाणी उपलब्ध असल्याने विदर्भातही आगामी काळात पाणी



वापराचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी महत्त्वाच्या १३ प्रमुख प्रकल्पांमध्ये सुमारे ३४.५३३ टीएमसी म्हणजे ५८.८७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. उत्तर जिल्ह्यातील भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि आढळा धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा आहे. भंडारदरा ९०.७६ टक्के, निळवंडे ६३.७७ टक्के, मुळा ६३.२५ टक्के आणि आढळा धरण ९३.९६ टक्के भरलेले आहे.

मात्र दक्षिण अहिल्यानगरमधील सीना धरणात २४.६३ टक्के, खैरीमध्ये १६.९२ टक्के, मांडओहळमध्ये १६.२३ टक्के, तर घाटशीळ-पारगाव धरणात शून्य टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. त्यामुळे दक्षिण भागातील शेतकऱ्यांसमोर पाणीटंचाईचे आव्हान कायम आहे.

मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या जायकवाडी धरणात सध्या ५१.२७ टीएमसी म्हणजे ६६.८७ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे समन्यायी पाणीवाटप कायदा २००५ मधील तरतुदी लक्षात घेता सद्यस्थितीत नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरण समूहांतून जायकवाडीसाठी पाणी सोडण्याची आवश्यकता नसल्याचे मत अभियंता चकोर यांनी व्यक्त केले.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील घोड आणि कुकडी प्रकल्प समूहात ८५.७१ टक्के पाणीसाठा असल्याने दक्षिण अहिल्यानगरमधील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण समूहातही ७४.०७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रब्बी हंगामाचे पीक नियोजन महत्त्वाचे

राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती पाहता पुढील आठ ते दहा महिन्यांचा कालावधी लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पीक निवड आणि सिंचनाचे नियोजन उपलब्ध पाण्यानुसार करावे लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धरणांतील पाणीवाटपाचे सूक्ष्म नियोजन सुरू असल्याचेही चकोर यांनी सांगितले.

राज्यातील प्रमुख धरणांमध्ये पाणीसाठा समाधानकारक असलेल्या भागांना दिलासा मिळाला असला, तरी मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण अहिल्यानगरमधील परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध साठ्याचा काटकसरीने वापर करणे हीच आगामी काळातील सर्वांत मोठी गरज ठरणार आहे.

कुलगाममध्ये सुरक्षा दलांची मोठी कारवाई

लष्कर कमांडर लतीफ भट ठार

श्रीनगर (वृत्तसंस्था)

जम्मू-काश्मीरातील कुलगाम येथे बुधवारी सकाळी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी लष्कर-ए-तोयबाच्या लतीफ भट नावाच्या दहशतवाद्याला ठार केले. तो एका मशिदीमध्ये लपून बसला होता. चकमकीपूर्वी सुरक्षा दलाच्या जवानांनी व्हिडिओ कॉलद्वारे त्याच्याशी संपर्क साधून त्याला शरणागती पत्करण्याचे आवाहन केले. एका पोलीस अधिकाऱ्याने त्याला सांगितले, आम्ही तुझ्यासाठी इथे आलो आहोत. तुझ्यापुढे तुझे आयुष्य पडले आहे. त्यावर लतीफने उत्तर दिले, मी अल्लाहला भेटायला चाललो आहे. मी खूप आनंदी आहे. मी शरणागती पत्करणार नाही.सुरक्षा दलांच्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर रोजी लतीफने उमर निसार दार याच्यासोबत मिळून नौपोरा अखरान येथील सीआरपीएफ (उठ्झाक्र) चौकीवर गोळीबार केला होता. तेव्हापासून दोघेही फरार होते.



१६ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी अखरानच्या लारू भागात या दोन्ही दहशतवाद्यांना घेरले. त्यानंतर झालेल्या चकमकीत उमर मारला गेला. मात्र पायाला गोळी लागलेली असूनही लतीफ तिथून पळून जाण्यात यशस्वी झाला. त्यानंतर संपूर्ण परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली.११ नोव्हेंबर रोजी कुलगाम येथे झालेल्या हल्ल्यात सहभागी असलेला उमर निसार दार याने लष्कर कमांडर लतीफ भटला सहा महिने आश्रय दिला होता. हल्ल्यापूर्वी या दोघांनी अनेक परिसरांची रेकी केली होती.

लष्कर कमांडर दहशतवादी मोहम्मद लतीफ भट उर्फ लतीफ बट याच्यावर पोलिसांनी १५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. २२ वर्षीय लतीफ हा कुलगाममधील खेवां चादेर (अश्मुजी) येथील रहिवासी होता. २०२५च्या सुरुवातीला तो घरातून बेपत्ता झाला होता. त्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.

नंतर पाकिस्तानात बसलेल्या ऑपरेटिव्ह सज्जाद गुलने त्याची लष्कर-ए-तोयबा आणि त्याच्या प्रॉक्सी नेटवर्क टीआरएफमध्ये भरती केली होती. लतीफने अशमुजी येथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेतून बारावीपर्यंत शिक्षण घेतले होते. त्यानंतर त्याने काही काळ कुलगामच्या सरकारी पदवी महाविद्यालयात शिक्षण घेतले आणि मग सुतारकाम करू लागला. १६ नोव्हेंबरला कुलगामच्या लारनू बायपासवर झालेल्या गोळीबारात त्याचा साथीदार उमर निसार भटही मारला गेला होता. गेल्या ६ महिन्यांत जम्मू-काश्मीरमध्ये लष्कर-ए-तोयबाचे ४ कमांडर मारले गेले आहेत.

शुक्रवारी संत नामदेव अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन

माजी मंत्री बाळासाहेब थोरात व मा.आ. डॉ. सुधीर तांबे यांची उपस्थिती

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- महाराष्ट्राला मोठी थोर वारकरी परंपरा लाभली असून या परंपरेतील संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने जयहिंद लोकचळवळ व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी सायं.५.३० वा. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयात महाराष्ट्राचे मा. महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे आमदार सत्यजित तांबे व डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये शबदकिर्तन व अभंगवाणी हा संत नामदेव महाराज यांच्या अभंग वाणी व विवेचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सौ दुर्गाताई तांबे व प्रकल्प प्रमुख प्रा.विठ्ठल शेवाळे यांनी दिली आहे.







यावाबत अधिक माहिती देताना संत साहित्याचे अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे म्हणाले की, समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारी मोठी संत आणि समृद्ध परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे या संत परंपरेतील पहिले संत शिरोमणी म्हणून संत नामदेव महाराज आहेत. नाचू कीर्तनाचे रंगी हा अभंग प्रत्येकाच्या मुखात आहे. समाजामध्ये संतांनी सांगितलेला उपदेश आणि त्यांची अभंगवाणी पुढे जावी याकरता जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून शबद कीर्तन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांमधून संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या विविध अभंगांचे गायन व त्याचे विवेचन होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मा आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. प्राध्यापक विनोद राऊत व त्यांचा समूह तर इकबालसिंग बत्रा व विद्यालयाचे विद्यार्थी सुद्धा अभंगांचे गायन करणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे करणार आहेत. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता या शब्दकिर्तन सुरेल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या अभंगवाणी कार्यक्रमासाठी संगमनेर तालुका व शहर मधील सर्व वारकरी विचारांचे पाईक, वारकरी मंडळी, साहित्याचे अभ्यासक, नागरिक बंधू-भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जय हिंद लोकचळवळ व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

गंभिरेवाडीत 'एक साडी तिच्यासाठी' उपक्रम उत्साहात

५३ महिलांना साड्या व दिवाळी फराळाचे वाटप; श्रीराम ग्रामविकास ट्रस्टचा स्तुत्य कार्यक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- अकोले तालुक्यातील गंभिरेवाडी (पैठण) येथे श्रीराम ग्रामविकास ट्रस्ट, मुंबई-पुणे येथील नोकरदार वर्ग आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या संयुक्त सहकार्याने 'एक साडी तिच्यासाठी' हा सामाजिक उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमांतर्गत परिसरातील ५३ महिलांना साड्या आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमाची संकल्पना कृषी अधिकारी अनिल गंभिरे यांनी मांडली असून, 'ऋण-नशश' टीमने सलग दुसऱ्या वर्षी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. मुंबई-पुणे येथे नोकरीनिमित्त स्थायिक असलेल्या गावातील तरुणांचा आणि स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी कृती समिती, महाराष्ट्र (पुणे)चे अध्यक्ष इंजि. नामदेव गंभिरे होते. तर व्यासपीठावर दैनुंजी घिगे उपस्थित होते. यावेळी इंजि. नामदेव गंभिरे यांनी ग्रामसंघटन आणि सामूहिक



सहभागातून गावाच्या विकासाचा संकल्प व्यक्त केला. आगामी पाच वर्षांत गंभिरेवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी पाच महत्त्वाची कामे पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले. यामध्ये मुख्य रस्ता ते ओहळपर्यंत काँक्रीट रस्त्याची निर्मिती, नदीकिनारील स्मशानभूमीचे विस्तारीकरण, प्राथमिक शाळेचे बांधकाम पूर्ण करणे, पाण्याची टाकी उभारून प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करणे तसेच अपूर्ण मंदिराचे बांधकाम पूर्ण करणे या कामांचा समावेश आहे. केवळ सामाजिक उपक्रमांपुरते मर्यादित न राहता गावाच्या मूलभूत सुविधांसाठीही एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मुंबई-पुण्यातील नोकरदार वर्ग आणि गावातील ग्रामस्थ यांच्यातील समन्वयातून गावाच्या विकासाला नवी दिशा देण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मण गंभिरे, भिकाजी मेचकर, योगेश मेचकर, भरत घिगे, दीपक गंभिरे, सचिन भांगरे, इंजि. सुनील भांगरे तसेच सौ. निशा गंभिरे, विमलताई मेचकर, सुमनबाई भवारी, शांताबाई गंभिरे, घमाबाई गंभिरे, लताताई गंभिरे यांच्यासह अनेक महिला व ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले.

सामाजिक बांधिलकी जपत महिलांच्या आनंदात भर घालणारा आणि गावाच्या विकासासाठी एकजुटीचा संदेश देणारा 'एक साडी तिच्यासाठी' हा उपक्रम गंभिरेवाडीसाठी प्रेरणादायी ठरला.

संपादकीय...

पाणी, चारा आणि रोजगार ग्रामीण भागापुढील तिहेरी संकट!

ग्रामीण भारत हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेती, पशुपालन आणि ग्रामीण उद्योगांच्या माध्यमातून देशाच्या विकासाला मोठे योगदान मिळते. मात्र आज ग्रामीण भागातील परिस्थिती चिंताजनक बनत चालली आहे. एका बाजूला पाण्याची टंचाई, दुसऱ्या बाजूला पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्न आणि तिसरीकडे हाताला काम नसल्याने वाढणारी बेरोजगारी, अशा तिहेरी संकटाचा सामना ग्रामीण समाजाला करावा लागत आहे. या प्रश्नांकडे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांच्या दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही, तर त्यासाठी दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता आहे. पाणी हा ग्रामीण जीवनाचा सर्वात महत्त्वाचा आधार आहे. पावसाचे अनिश्चित स्वरूप, भूजल पातळीत होणारी घट, अपूर्ण जलसंधारणाची कामे आणि पाण्याचा अनियंत्रित वापर यामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. दरवर्षी उन्हाळा जवळ आला की टँकरची मागणी, विहिरींचे आटलेले पाणी आणि कोरड्या पडलेल्या विहिरी हे चित्र दिसू लागते. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ टँकरवर अवलंबून न राहता गावपातळीवर जलसंधारण, शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण आणि पावसाच्या पाण्याचे नियोजन यांना प्राधान्य दिले पाहिजे. पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. पाण्याच्या संकटाबरोबरच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होत आहे. ग्रामीण भागात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन केले जाते. मात्र चारा उपलब्ध नसल्यास शेतकऱ्यांना जनावरे सांभाळणे आर्थिकदृष्ट्या कठीण जाते. दुष्काळी परिस्थितीत हिरवा चारा, कोरडा चारा आणि मुरघास यांची उपलब्धता कमी होते. परिणामी पशुधनाच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि दुग्धव्यवसायाचे अर्थकारणही कोलमडते. चारा छावण्या, चारा डेपो, चारा बियाणे वाटप आणि मुरघासनिर्मिती यांसारख्या उपाययोजना नियोजनबद्ध पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. पशुधन वाचले तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार टिकून राहील. तिसरा आणि तितकाच गंभीर प्रश्न म्हणजे ग्रामीण बेरोजगारी. शेतीतून मिळणारे उत्पन्न अनिश्चित असल्याने ग्रामीण तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. गावातील पारंपरिक व्यवसाय कमी होत आहेत. शिक्षण घेतलेल्या तरुणांना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगार उपलब्ध होत नाही. परिणामी ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिक समतोल बिघडत आहे. गावागावांत लघुउद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, कृषीपूरक उद्योग आणि कौशल्य विकास केंद्रांना प्रोत्साहन दिल्यास रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. पाणी, चारा आणि रोजगार हे तीनही प्रश्न एकमेकांशी जोडलेले आहेत. पाणी नसेल तर शेती अडचणीत येते, शेती अडचणीत आली तर चारा आणि पशुधनाचा प्रश्न निर्माण होतो आणि शेती-पशुपालनातून उत्पन्न मिळाले नाही तर बेरोजगारी व स्थलांतर वाढते. त्यामुळे या प्रश्नांकडे स्वतंत्रपणे न पाहता एकात्मिक ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. सरकारने योजनांची घोषणा करण्याबरोबरच त्यांची प्रभावी अंमलबजावणी, निधीचा योग्य विनियोग आणि नियमित आढावा यावर भर द्यावा. लोकप्रतिनिधी, प्रशासन, ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि ग्रामस्थ यांनीही एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. कारण ग्रामीण भाग सक्षम झाला तरच राज्याची अर्थव्यवस्था सक्षम होईल. पाणी, चारा आणि रोजगार या मूलभूत गरजांची हमी मिळणे ही ग्रामीण जनतेची अपेक्षा नसून त्यांचा हक्क आहे. या तिहेरी संकटावर आजच ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर उद्याचे ग्रामीण वास्तव अधिक कठीण होईल. त्यामुळे आता घोषणांचा नव्हे, तर कृतीचा काळ आहे!

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत जोर्वे गावामध्ये



संगमनेर - ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव २०२६-२७ अंतर्गत येथील कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांचे संगमनेर तालुक्यातील जोर्वे गावात आगमन झाले आहे. या निमित्ताने ग्रामस्थांच्यावतीने पारंपरिक पद्धतीने त्यांचे अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी कृषीदूतांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असून त्यांच्या कृषी विषयक ज्ञानाचा गावाला नक्कीच फायदा होईल, अशी आशा व्यक्त केली आहे. या स्वागत समारंभाप्रसंगी जोर्वे गावचे सरपंच मा. सौ . प्रीती गोकुळ दिघे, उपसरपंच मा. श्री. बादशाह बोरकर सहाय्यक कृषी अधिकारी मा. अर्चना नवले मॅडम यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी साहिल लहांगे, चैतन्य नवले, करण पटारे, प्रदीप रंधे, मोहित शिंदे आणि रोहित यादव हे कृषिदूत पुढील काही महिने जोर्वे गावामध्ये मुक्कामी राहणार आहेत. यादरम्यान हे सर्व कृषीदूत गावातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेती विषयक प्रात्यक्षिके, डिजिटल शेती आणि शासनाच्या विविध कृषी विषयक कल्याणकारी योजनांची माहिती थेट त्यांच्या शेताच्या बांधापर्यंत जाऊन देणार आहेत. यामुळे जोर्वे गावात कृषीविषयक जनजागृती होऊन येथील शेतीला एक नवी दिशा मिळेल, असा विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला. सदर कृषी अभ्यास कार्यानुभव कार्यक्रम माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली राबवला जाणार आहे. तसेच ह्यास संस्थेच्या सचिव सौ. शरयूताई देशमुख आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. निंबाळकर सर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. ह्या उपक्रमास कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, प्रशासकीय अधिकारी प्रा. जी. बी. बाचकर, शैक्षणिक प्रमुख प्रा. रविंद्र दसपुते तसेच ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रम अधिकारी डॉ. साजन हिंगोणेकर व इतर प्राध्यापक आणि विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

पान १ वरून

अहिल्यानगर जिल्ह्यात...

तफावत असल्याने प्रशासनाने चारा वाहतुकीवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी १६ नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्याबाहेर चारा वाहतुकीस बंदी घालण्यात आली होती. मात्र, सद्यस्थितीत जिल्ह्यातील चारा उपलब्धतेचा आढावा घेतल्यानंतर ही बंदी आणखी दोन महिने कायम ठेवण्याची आवश्यकता असल्याचे पशुसंवर्धन विभागाने जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानुसार जिल्ह्यात उत्पादित होणारा हिरवा व कोरडा चारा, मुरघास आणि टोटल मिक्स रेशन (टीएमआर) इतर जिल्ह्यांत वाहून नेण्यास मनाई करण्यात आली आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ नुसार जिल्हाधिकार्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश काढण्यात आला आहे. आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून पुढील दोन महिन्यांच्या कालावधीसाठी ही बंदी लागू राहणार आहे.दरम्यान, जिल्ह्यातील पशुधनासाठी उपलब्ध होणारा चारा जिल्ह्यातच राहावा आणि स्थानिक पशुपालकांना चारा टंचाईचा अधिक फटका बसू नये, हा या निर्णयामागील उद्देश आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय व तालुका दंडाधिकारी, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अध्यक्षपदानंतर सुजय विखेंची मुख्यमंत्र्यांशी भेट



मुंबई : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी आज मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आशीर्वाद घेतले तसेच त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची सद्यस्थिती, जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम आर्थिक पाठबळ देणे, सहकारी संस्थांचे बळकटीकरण आणि ग्रामीण भागाच्या विकासात बँकेची भूमिका यासंदर्भात यावेळी चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्या हातून चांगले काम घडावे, अशा अपेक्षाही व्यक्त केल्या.

यावेळी झालेल्या भेटीत मुख्यमंत्र्यांनी दिलेले मार्गदर्शन आणि शुभेच्छा आपल्यासाठी महत्त्वाच्या असल्याची भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या एकोप्यातून जपली जाते कानिफनाथांची सेवा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते या देवस्थानात हिंदू रिती रिवाजनुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध , हार फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता तर सायंकाळची आरती सायंकाळी ७ : ३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप होते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे. देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते.

देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी नेमले असून आकाश शशिकांत सातपुते सुकेवाडी अशोक महादू खर्डे सुकेवाडी हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत. नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार,कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर, अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. नोव्हेंबर २०२६ महिन्यातील ३० दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी संजय रामनाथ गुंजाळ, सुनील नबाजी सातपुते, रामनाथ जगन्नाथ सातपुते, गोरक्ष रंगनाथ तनपुरे, योगेश रमेश गिरी सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे दर पौर्णिमेला देवस्थानात होम - हवंनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे, आधी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी सुनील हरिभाऊ पावभाके, दर्शन भारत शिंदे, राहुल भागवत शिंदे, मनोज किशोर गोसावी यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे.

Jijamata English Medium School
Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliated School

WALK-IN INTERVIEW
We invite applications for the following positions:

Mother Teachers | Grade I&II Teachers

English | Hindi | Marathi | Maths
Social Science | Sport | Computer

Sunday 22nd November 2026 Time : 9:00 am. to 1:00 pm

Freshers can apply

Preference will be given to candidates fluent in English with teaching experince in CBSE Schools or other English Medium Schools

Interested Candidates can submit their updated resumes in person at the school before 20 November 2026 or by email to shewalepatiltrust@gmail.com/ dr.rahulshewale@gmail.com or in person at the school office.

Contact :- 9822304638

ई-निविदा सुचना क्रमांक २२/२०२६-२७
संक्षिप्त निविदा सुचना

कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक दुरध्वनी क्र. ०२५३-२५७८०१२ 'E-mail- elnashik.ee@mahapwd.gov.in हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडुन शासन निर्णयानुसार आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत व तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडुन ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करणेत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा कोणत्याहि स्तरावर रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नांव : अहिल्यानगर जिल्हयातील एकुण ६ काम.
ई-निविदा उपलब्ध कालावधी: दिनांक १८.११.२०२६ ते २५.११.२०२६
ई-निविदा उघडणे: निविदा उघडणे: दिनांक २६.११.२०२६
https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे असल्यास संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विद्युत विभाग,नाशिक.





पाहिजेत
कामासाठी मुलगा पाहिजे - जागा -१
संगणक ज्ञान
(Microsoft Excel, Tally Erp)
Kshitij Electricals & Instrumentation Works
१४११ संगम हाऊसींग सोसायटी, घुलेवाडी, संगमनेर
9822244035

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SWAMINI ANIL GODASE
NEW NAME AS
SWAMINI ANIL GODSE
ADDRESS - TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
ANIL DADBHAU GODSE
NEW NAME AS
ANIL DADABHAU GODSE
ADDRESS - TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

पाहिजेत
7th Heaven
केकशॉपमध्ये जॉबसाठी फुलटाईम
महिला/ मुली - २ जागा
पुरूष/ मुले- २ जागा
वयोमर्यादा- २० ते ३५ वर्ष
सावता माळी नगर, संगमनेर
7447 877 877

पाहिजेत
नर्सिंग स्टाफ - बीएससी/जीएनएम (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२, नाईट - २)
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२)
रिसेप्शनिस्ट - (इव्हीनींग-२ ते १०)
डाटा एन्ट्री - बी. कॉम (१ जागा)
मावशी/ वॉर्ड बॉय (२ जागा)
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष - ४ जागा
महिला - २ जागा
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
गरजू व अनुभवी
साईट इंजिनीअर,
सुपरवायझर व
ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर ०१
गोडाऊन सुपरवायझर ०१
- पत्ता-
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१
कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
(टॅली ज्ञान अवश्यक)
जागा -१
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट,
माळीवाडा, ता. संगमनेर
संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.
संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- बिझनेस एक्झिक्युटिव्ह - ४
- कार्यालयीन प्रशासक - १
- आयटी प्रोफेशनल - १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १
पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संपामुळे अकोले न्यायालयाचे कामकाज झाले ठप्प

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- न्यायालयीन कर्मचाऱ्यांना 'समान काम, समान वेतन' लागू करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली १७ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. या संपामुळे अकोलेसह राज्यातील न्यायालयांचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे. राज्यातील सुमारे ३४ हजार कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत.

या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी काळ्या फिती लावून कामकाज करत आंदोलनाचे टप्पे पूर्ण केले होते. मात्र, शासनाकडून सकारात्मक निर्णय न झाल्याने अखेर बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला. समान काम व जबाबदाऱ्या असताना वेतनात तफावत असणे अन्यायकारक असल्याची

भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. या मागणी संदर्भातील प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयामार्फत शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

अकोले येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील अधीक्षक एस. एम. अरगडे, दीपक महाले, दत्तात्रय ठोंबे, सचिन कुलकर्णी, सहायक अधीक्षक अविनाश कचरे, सचिन शिर्के यांच्यासह सर्व न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. शासनाने मागणीचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मांगणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

समान काम, समान वेतनासाठी न्यायालयातील कर्मचारी संपावर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - 'समान काम, समान वेतन' या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून न्यायालय प्रवेशद्वाराबाहेर आंदोलन सुरू केले आहे.



न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या सामूहिक निर्णयानुसार, मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्यातील जिल्हा व तालुका न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. आंदोलनाला अहिल्यानगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने आणि जिल्ह्यातील चारही कर्मचारी संघटनांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे व कार्यकारी सचिव रविंद्र सूर्यपुजारी यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना या आंदोलनाबाबत निवेदन सादर करण्यात आले होते. याच राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून संगमनेर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी व फौजदारी न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांनी सकाळपासून न्यायालय परिसर प्रवेशद्वाराबाहेर एकत्र येत शांततेत ठिय्या मांडला. न्याय्य हक्कांसाठी कर्मचारी आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत 'समान काम, समान वेतन' या मागणीवर सकारात्मक निर्णय होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यामुळे संगमनेर न्यायालयातील दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. सुनावणीसाठी आलेले पक्षकार आणि वकिलांची काहीशी गैरसोय होत असली, तरी न्याय्य मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी शांततामय मार्गाने लढा पुकारला आहे.

दिवाळीत लालपरी सुसाट! राज्यात ५४८ कोटींची कमाई

संगमनेर आगारालाही कोटींचा महसूल

मुंबई (वृत्तसंस्था)

दिवाळीचा सण आणि सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) लालपरीला मोठी पसंती दिली आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात यंदा विक्रमी वाढ झाली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या १६ दिवसांत राज्यभरातील एसटीने तब्बल ५४८ कोटी २२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे, १६ नोव्हेंबर रोजी परतीच्या प्रवाशांच्या प्रचंड गर्दीमुळे एकाच दिवसात ४६ कोटी ५३ लाख रुपयांची विक्रमी कमाई झाली. या दिवाळीच्या हंगामात संगमनेर एसटी आगारानेही उत्पन्नाच्या बाबतीत दमदार कामगिरी केली आहे.



दिवाळी, सलग सुट्ट्या आणि गावी जाण्यासाठी निघालेल्या प्रवाशांची वाढती संख्या यामुळे राज्यातील एसटी बसस्थानकांवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. नोव्हेंबरच्या पहिल्या १६ दिवसांत एसटीची दररोजची सरासरी कमाई ३४ कोटी २५ लाख रुपये इतकी राहिली. ऑक्टोबर महिन्यात महिला सन्मान योजनेच्या अंमलबजावणीतील सक्ती आणि दुष्काळी परिस्थितीचा एसटीच्या उत्पन्नावर काही प्रमाणात परिणाम झाला होता. मात्र, नोव्हेंबरमध्ये दिवाळीच्या हंगामामुळे उत्पन्नाला पुन्हा मोठी चालना मिळाली. महिला सन्मान योजनेच्या अंमलबजावणीत देण्यात आलेली शिथिलता आणि गर्दीच्या हंगामातील हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा महामंडळाचा निर्णयही प्रवाशांच्या पसंतीस उतरला.

सुरक्षित, विश्वासार्ह आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय म्हणून प्रवाशांनी एसटीला प्राधान्य दिले. विशेषतः महिलांनी माहेरी जाण्यासाठी तसेच कुटुंबीयांसह प्रवास करण्यासाठी लालपरीची निवड केली. त्यामुळे दिवाळीच्या काळात राज्यातील एसटी बसस्थानकांवर प्रवाशांची अक्षरशः गर्दी उसळली होती.

या राज्यव्यापी यशात संगमनेर एसटी आगारानेही उल्लेखनीय योगदान दिले आहे. दिवाळीच्या अवघ्या १२ दिवसांत संगमनेर आगाराने एसटीच्या फेऱ्यांमधून एक कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवले आहे. आगार प्रमुख नीलेश बेंडकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत आगारातून एसटीच्या हजारो फेऱ्या झाल्या. या काळात सुमारे २ लाख ९५ हजार किलोमीटरचा प्रवास करण्यात आला. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन आगार प्रशासनाने विविध मार्गांवर जादा गाड्यांची व्यवस्था केली होती. पुणे, नाशिक, मुंबई, अहिल्यानगर, तुळजापूर, बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगर यांसह विविध महत्त्वाच्या मार्गांवर संगमनेर आगारातून बससेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. मध्यवर्ती आणि हायटेक स्वरूपाच्या संगमनेर बसस्थानकावर दिवाळीच्या काळात प्रवाशांची मोठी वर्दळ होती. त्यामुळे बसस्थानकाला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

एकीकडे राज्यभरात एसटीने उत्पन्नाचा नवा विक्रम नोंदवला, तर दुसरीकडे संगमनेर आगारानेही दिवाळीच्या गर्दीचे उत्तम नियोजन करत महसुलात समाधानकारक भर घातली. प्रवाशांचा वाढता विश्वास आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे लालपरीची दिवाळी यंदा खऱ्या अर्थाने गोड झाली आहे.

महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी २२ डिसेंबरला प्रसिद्ध होणार!

युवावार्ता (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेसंदर्भात भारतीय निवडणूक आयोगाने महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार महाराष्ट्रासह ७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ड्राफ्ट प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्रातील अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात एएसडीडी मतदारांच्या गणना अर्जांसंदर्भातही महत्त्वाचे वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत गणना अर्जांची निर्मिती आणि छपाई पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर १८ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्जांचे वितरण आणि संकलन केले जाणार आहे. तर १० डिसेंबर २०२६ पर्यंत गणना अर्जांचा निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार महाराष्ट्रात दावे आणि हरकतींच्या प्रक्रियेसाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते १५ डिसेंबर २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर २२ डिसेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, दिल्ली, नागालँड, तेलंगणा, हरियाणा आणि झारखंड या राज्यांचा व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. या सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २२ डिसेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे.निवडणूक आयोगाने संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आणि प्रशासकीय यंत्रणांना या निर्णयाची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच एएसडीडी मतदारांच्या गणना प्रक्रियेची आणि एसआरआयए २०२६ च्या सुधारित वेळापत्रकाची सर्व उपलब्ध माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यास सांगितले आहे. राजकीय पक्षांनाही या बदललेल्या वेळापत्रकाची लेखी स्वरूपात माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेला आता वेग येणार असून, २२ डिसेंबरला प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संगमनेरच्या राजकीय इतिहासातील धगधगते हिमशिखर

पुस्तक परिक्षण

आजचा संघर्ष उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो, असे एक वाक्य के. बी. दादा कनिष्ठ महाविद्यालय, धांदरफळ येथील शाळेच्या भिंतीवर वाचले होते. तेथे शिकत असताना नेहमी विचार यायचा, हे के. बी. दादा देशमुख म्हणजे कोण? पुढे पत्रकारिता पदविकेला प्रवेश घेतला आणि 'संगमनेर तालुक्याची राजकीय वाटचाल' या मथळ्याखाली अभ्यास सुरू झाला. अर्थात, शिक्षक होते डॉ. खेडलेकर सर! कोणताही प्रश्न विचारा, समाधानकारक उत्तर हमखास मिळायचे. तरी त्या नावाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता अधिक होतीच. एक दिवस निवांत गप्पा मारताना त्यांनी के. बी. दादांबद्दल अनेक प्रसंग सांगितले. आपण या विषयावर दीर्घ लेखन करत आहोत, याचीही कल्पना दिली. के. बी. दादांच्या गावचा असल्याने त्यांच्याबद्दल पुस्तक कधी येणार, याची उत्सुकता मनाला लागली होती. अखेर प्रतीक्षा संपली, पुस्तक पूर्ण झाले


काही माणसे परिस्थितीचा बाऊ न करता आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर अलौकिक सामर्थ्य निर्माण करतात, याचेच एक उदाहरण म्हणजे धांदरफळचे केशव बळवंतराव देशमुख. संगमनेरचे पहिले आमदार. त्यांच्या जीवनावरील 'धगधगते हिमशिखर' ही त्यांची चारित्रात्मक संघर्षगाथा. सह्याद्रीच्या डोंगर-दऱ्यांची वाट तुडवत वाहणारी प्रवरामाई जेव्हा आपल्या म्हाळुंगी, म्हानुटी आणि नाटकी या तिन्ही लेकींना आपल्या उदरात सामावून घेते, तो माय-लेकींचा पवित्र संगम म्हणजेच 'संगमनेर' शहर. या संघर्षगाथेची सुरुवात होते ती याच संगमनेर परिसरात. तालुक्यातल्या धांदरफळ या छोट्याशा गावातून एकदा बैलगाडीने वडिलांच्या सोबत बाजार आणि इतर कामासाठी संगमनेरला आलेला चौथीत शिकणारा केशव अचानक वकील होण्याचे स्वप्न का पाहू लागतो? संगमनेरला आल्यावर एका वकिलाच्या घरी असे काय घडले की त्याच्या बालमनाला तो अपमान सहन झाला नाही? मनात रुजलेले वकील होण्याचे ते विचारबीज प्रत्यक्षात कसे साकार झाले? अशा अनेक गोष्टी पुस्तकातून कळतात.

त्या एका छोट्याशा प्रसंगातून सुरू झालेला केशवचा हा प्रवास पुढे एका सामान्य व्यक्तिमत्त्वाच्या असामान्य जडणघडणीची कहाणी सांगू लागतो. पहिले प्रकरण वाचकाला थेट १९व्या शतकाच्या पूर्वार्धात, म्हणजेच केशवच्या बालपणात घेऊन जाते.

जीवनात संघर्ष कुणाला चुकलाय? सातवीपर्यंत शिक्षण घेऊनही आपल्या नवऱ्याला शेतीतच राबावे लागते अशी खंत चौदा पंधरा वर्षाच्या पत्नीला वाटते. केशवला उराशी बाळगलेले वकील होण्याचे स्वप्न मनाला बेचैन करत होते. एक दिवस त्याने आपल्या मनातील ही घालमेल पत्नीसमोर बोलून दाखवली. तेव्हा दोघांचेही एकमत झाले आणि पत्नी म्हणाली, खरं सांगू... हेच माझ्या मनात व्हतं... रानात औत हाकणं तुमचं काम न्हायी... तुमी लई शिका... माला बी हेच वाटतं. अवघ्या पंधरा-सोळा वर्षांची केशवची पत्नी केवळ त्याच्या मनातलं स्वप्न समजून घेत नाही, तर त्या स्वप्नपूर्तीसाठी स्वतःच्या काळजावर दगड ठेवून त्या स्वप्नासाठी भागीदारी करू पाहते. लेखकाने या प्रसंगातून साकारलेली तिची स्त्री प्रतिमा वाचकाच्या मनाचा ठाव घेते.

अनेक प्रकरणांमध्ये लेखक परकाया प्रवेशाचे सूत्र वापरून कथनाची मांडणी करतो. परंतु इतर धोपट चरित्रलेखकांप्रमाणे लेखक चंद्र, सूर्य, ताऱ्यांमध्ये रमत नाही, तर तो वाचकाला नायकाच्या वास्तववादी आणि खऱ्या जीवनाचे दर्शन घडवतो. आम्ही जातपात न मानणाऱ्या लेले मास्तरांचे विद्यार्थी आहोत... आज जर प्रभाकरला जिलेबी वाढायला तुम्ही हरकत घेणार असाल, तर आम्ही सगळे विद्यार्थी आज जेवणार तर नाहीच; पण यावर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनावर बहिष्कार घालू. आपला दलित वर्गमित्र पंक्तीत जेवण वाढणार म्हणून पंगतीत अचानक चुळबूळ सुरू होते. त्यावेळी केशव आणि शाळेचे मुख्याध्यापक असलेल्या लेले मास्तरांनी घेतलेली भूमिका, त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन वाचल्यानंतर केशवची सुधारणावादी भूमिका आणि त्याच्यावर झालेला लेले मास्तरांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. केशवरावांचे सुधारणावादी विचार मांडताना लेखकाने पुस्तकात अनेक ऐतिहासिक दाखले आणि संदर्भ दिले आहेत. विशेष म्हणजे, ज्या मित्राच्या सन्मानासाठी केशवरावांना शालेय जीवनात संघर्ष करावा लागला, तेच प्रभाकर रोहम पुढे मुंबई प्रांताच्या असेंब्लीमध्ये केशवरावांसोबत आमदार म्हणून निवडून आले. हा प्रसंग केवळ योगायोग की सामाजिक समतेच्या विचारांची कृतिशीलता, असा प्रश्न वाचकाच्या मनात निर्माण होतो. पुस्तकातील स्त्री प्रतिमांचा विचार करताना सर्वप्रथम समोर येते ती गीताबाई. या केशवरावांच्या पहिल्या पत्नी. पतीच्या मनातील शिक्षणाची आणि वकील होण्याची महत्त्वाकांक्षा समजून घेत, त्याच्या स्वप्नपूर्तीसाठी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांना मुरड घालून आपलं अवघ आयुष्य पणाला लावणारी त्यांची भूमिका वाचकांना अचंबित करते.

या पुस्तकातील दुसरी स्त्री प्रतिमा म्हणजे केशवचे हेडमास्तर देवीदास लेले यांच्या पत्नी शांताबाई लेले. केशवरावांना आपल्या मुलाप्रमाणे माया लावणाऱ्या सौ. लेले. तिसरी स्त्री प्रतिमा सीताबाई काकड यांची. केशवरावांच्या आयुष्यातील संघर्षाच्या



काळात काही काळ त्यांना आपल्या घरी आश्रय देऊन त्यांनी माणुसकीचा आणि आपुलकीचा प्रत्यय दिला. सीताबाई काकड यांचा उल्लेख सहकारातील ज्येष्ठ दिवंगत नेते भाऊसाहेब थोरात यांच्या 'अमृतगाथा' या पुस्तकातही आढळतो. तर चौथी स्त्री प्रतिमा म्हणजे केशवरावांच्या पत्नी आणि बडोद्याच्या जागृतिकार भगवंतराव पाळेकर यांच्या कन्या जयदेवी बाई. केशवरावांच्या दुसऱ्या पत्नी म्हणून त्यांनी त्यांच्या आयुष्यात दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. केशवरावांच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनाच्या प्रवासात त्यांची साथ, समजूतदारपणा आणि योगदान यांना विशेष महत्त्व आहे.

अशा विविध स्त्रीप्रतिमांच्या माध्यमातून लेखकाने केवळ नायकाच्या आयुष्याभोवतीचे स्त्रीविश्व उभे केलेले नाही, तर एखाद्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत स्त्रियांचा त्याग, प्रेम, माया आणि सहकार्य किती महत्त्वाचे असते, हेही पुस्तक वाचताना जाणवते. पैशांअभावी कोणाचेही शिक्षण अडू नये, या उदात्त हेतूने बडोद्याला शिक्षण घेणारे केशवराव आणि त्यांच्या मित्रांनी एकत्र येऊन 'छत्रपती एज्युकेशन सोसायटी' या शिक्षणसंस्थेची स्थापना केली. या संस्थेचे धोरणही तितकेच आदर्शवादी होते. विद्यार्थ्यांनी आपल्या ऐपतीप्रमाणे शुल्क भरावे आणि ज्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे अथवा जे शुल्क भरू शकत नाहीत, त्यांचा एक पैकाही न घेता त्यांना प्रवेश द्यावा, असे या शाळेचे धोरण होते. गरीब असो वा श्रीमंत, दलित असो वा पददलित, अशा प्रत्येकाला शिक्षणाची समान संधी मिळावी, ही यामागील भावना होती.

स्वातंत्र्यापूर्वी केशवरावांचा असणारा हा उद्देश आणि शिक्षणाप्रतीची आस्था आजच्या काळातील महागडच्या आणि शिक्षणसंस्था चालकांसाठी कामधेनू अथवा 'दुभती गाय' बनलेल्या शिक्षणव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर हा विचार निश्चितच समाजाला आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

पुण्याच्या आयएलएस कॉलेजमध्ये वकिलीचे धडे गिरवत असताना, 'केसरी' वृत्तपत्रामध्ये पुणे कौन्सिलने मांडलेल्या आणि छोट्या शेतकऱ्यांच्या मुळावर उठणाऱ्या 'जमिनीचे तुकडा बिल' या बातमीचे वृत्त वाचताच बड्या जमीनदारांच्या हिताच्या या कायद्याविरोधात युवा केशवराव अस्वस्थ होतात. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना एकत्र करून ते शेतकऱ्यांमध्ये जनजागृती घडवून आणतात आणि त्या विरोधातील आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवतात. त्यावेळी शेतकऱ्यांच्या व्यथा पाहून चिंतन करणारे केशवराव, आपण वकील झाल्यानंतर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे, हा मनाशी बाळगलेला निर्धार अधिकच दृढ करतात.

शेतकऱ्याचं पोरगं वकील झालं! म्हणून केशवरावांचा सल्ला घेण्यासाठी लोकांची गर्दी वाढू लागली. दूरवरून बैलगाडीने प्रवास करून आलेल्या थकलेल्या-भागलेल्या पक्षकारांची चहापाणी अथवा जेवणाचीही व्यवस्था होत असे. तेव्हा देशमुख वकीलसाहेब केवळ कायदेशीर अडचणी सोडवत नाहीत, तर अशा प्रत्येक पक्षकाराच्या जेवणाची आणि राहण्याची उत्तम व्यवस्था आवर्जून करतात. विशेष म्हणजे, कायदेशीर लढाईत जे विरोधी पक्षाचे वकील असतात, त्यांच्या बाजूचे पक्षकारही 'आनंदभवनात' देशमुख वकीलसाहेबांकडे जेवणासाठी व मुक्कामासाठी साठी येत. आजच्या काळात पैशासाठी पक्षकारांशी हाडतुडीची, व्यावसायिक आणि बेरकी वागणूक देणाऱ्या वकिलांची अपवादात्मक संख्या असताना, देशमुख वकीलसाहेबांची ही 'माणसाने माणसाशी माणसासम वागण्याची' शिकवण वाचकांच्या मनाचा ठाव घेते. न्यायाच्या आणि कायद्याच्या चौकटीतही माणुसकीचा झरा कसा वाहता ठेवता येतो, याचे हे दुर्मिळ उदाहरण आहे.

इंग्रजांच्या जुलमी कायद्याविरोधात १९३० मध्ये अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह झाला. या सत्याग्रहात भाग घेतलेल्या शेतकरी आणि इतर आंदोलकांवर खटले दाखल होऊ लागले. या आंदोलकांचे खटले लढताना केशवरावांच्या वकिलीची सर्वदूर ओळख निर्माण झाली. न्यायालयात त्यांनी केलेले युक्तिवाद आणि मांडलेली बाजू यामुळे त्यांची वेगळीच छाप पडू लागली होती. केशवरावांनी विधुर व विधवा यांचे विवाह लावून देण्यासाठीही पुढाकार घेतला. अशा लग्नासाठी गावोगावी पत्रके वाटून लोकांना निमंत्रित करून समाजात जनजागृती केली. उत्तर नगर जिल्ह्यात वकिलीच्या माध्यमातून के. बी. दादांची चांगली ओळख निर्माण झाली होती. याच ओळखीच्या जोरावर त्यांना १९३७ मध्ये काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाली आणि ते आमदार म्हणून निवडूनही आले. त्यांच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी खुद्द पंडित नेहरू संगमनेरला सभा घेण्यासाठी आले होते.

मात्र या निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत, याची खंत के. बी. दादांना होती. त्यामुळे बंडाचा झेंडाबावटा हाती घेत, आपल्याच पक्षाच्या विरोधात शेतकरी परिषदा घेऊन काँग्रेस सरकारला जाब विचारण्यास त्यांनी सुरुवात केली. एवढेच नव्हे, तर राज्यातील काँग्रेस नेत्यांच्या कार्यपद्धतीविषयी तक्रार त्यांनी थेट तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांच्याकडे केली. यातून के. बी. दादांची निर्भीड वृत्ती दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'माझी आत्मकथा', प्रबोधनकार ठाकरे यांचे 'माझी जीवनगाथा', आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी' आणि यशवंतराव चव्हाण यांचे 'कृष्णाकाठ' या व अशा चरित्र-आत्मचरित्रांप्रमाणेच 'धगधगते हिमशिखर'मधूनही एका व्यक्तिमत्त्वाचा संघर्षमय जीवनप्रवास उलगडतो. या सर्व लेखनांमध्ये बालपणातील अनुभव, शिक्षणासाठी केलेला संघर्ष आणि वैचारिक जडणघडणीला महत्त्व दिलेले दिसते. सामाजिक विषमता, समाजसुधारणा आणि राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंबही त्यात उमटते. आमदार के. बी. दादा देशमुखांचे जीवन उलगडताना डॉ. संतोष खेडलेकर यांनी संशोधन, ऐतिहासिक संदर्भ आणि प्रसंगांचे सुरेख वर्णन यांचा सुंदर मिलाफ घडवला आहे. प्रसंगानुरूप संवाद, सहज-सोपी भाषा आणि ओघवती कथनशैली यामुळे वाचक अंतर्मुख होऊन पुस्तकातील घटनांशी जोडला जातो. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भाषेचा प्रसंगानुरूप वापर लेखकाने केला आहे. हे पुस्तक संगमनेर येथील नीरजा प्रकाशन यांनी प्रकाशित केले असून, त्याचे स्वागतमूल्य नाममात्र २५० रुपये इतकेच आहे. अविनाश वर्पे यांनी पुस्तकाच्या मांडणीसोबत मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ अतिशय सुबक आणि देखणे केले आहे, पृष्ठसंख्या ही साधारण दोनशेच्या आत असल्याने एका बैठकीत वाचून होण्याजोगे हे पुस्तक असून अलीकडच्या युवा पिढीला ही संघर्षगाथा नक्कीच प्रेरणा देणारी आहे.

ॲड. हृषिकेश म्हस्कुले, संगमनेर
मो. नं. 9112817117

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

संगमनेर शहर पोलिसांची दमदार कामगिरी!

CEIR पोर्टलच्या मदतीने ८ लाख ३६ हजारांचे ४७ हरवलेले मोबाईल शोधले



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठ तसेच गर्दीच्या परिसरातून हरवलेले किंवा गहाळ झालेले महागडे मोबाईल पुन्हा मिळविण्यात संगमनेर शहर पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलच्या माध्यमातून तब्बल ४७ मोबाईल शोधून हस्तगत केले आहेत. या मोबाईलची एकूण किंमत ८ लाख ३६ हजार ७४५ रुपये असून, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या हस्ते संबंधित मूळ मालकांना या मोबाईलचे वाटप करण्यात आले.

संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक नागरिकांचे महागडे मोबाईल सार्वजनिक ठिकाणी, बाजारपेठेत तसेच गर्दीच्या ठिकाणी हरवले होते. या मोबाईलचा शोध घेऊन ते संबंधित नागरिकांना परत मिळवून देण्यासाठी पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या स्थायी आदेशानुसार पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाला मोबाईल शोधण्याची जबाबदारी देण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सूरज मेढे आणि डी.बी. पथकातील कर्मचाऱ्यांनी तांत्रिक तपास व उएखठ पोर्टलच्या माध्यमातून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम हाती घेतली.

या मोहिमेदरम्यान पोलिसांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करून एकूण ४७ अँड्रॉइड मोबाईल हस्तगत केले. या सर्व मोबाईलची किंमत ८ लाख ३६ हजार ७४५ रुपये इतकी आहे. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने संबंधित नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. पोलिसांच्या या कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक सूरज मेढे, पोलीस हवालदार सातपुते, पोलीस कॉन्स्टेबल खुळे, नागरे, पांडे, आगलावे, कोदे आणि शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

हरवलेला मोबाईल शोधून तो पुन्हा मूळ मालकाच्या हातात देण्याच्या संगमनेर शहर पोलिसांच्या या उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, पोलिसांच्या तांत्रिक तपास क्षमतेचेही दर्शन घडले आहे.

लिफ्ट सुरक्षेच्या कठोर नियमांसाठी आ. सत्यजीत तांबे यांचा पाठपुरावा

१ नोव्हेंबरपासून राज्यभर नवीन नियमांची अंमलबजावणी सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई- महाराष्ट्रात सातत्याने घडणाऱ्या लिफ्ट दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी कठोर नियमावली लागू करण्याची मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १२ मार्च २०२६ रोजी केली होती. त्यांच्या या मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 'महाराष्ट्र लिफ्ट्स, एस्केलेटर्स आणि मूव्हिंग वॉक्स नियम, २०२६' अधिसूचित केले असून, १ नोव्हेंबर २०२६ पासून राज्यभर या नवीन नियमांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

नवीन नियमांनुसार आता प्रत्येक लिफ्टची दरमहा सर्व्हिसिंग, वार्षिक सुरक्षा तपासणी आणि सुरक्षा ऑडिट बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच थर्ड पार्टी इन्शुरन्स, जुन्या लिफ्टचे आवश्यकतेनुसार अपग्रेडेशन, सीसीटीव्ही कॅमेरे, स्वयंचलित रेस्क्यू डिव्हाइस (-ठऊ) आणि ओव्हरलोड प्रोटेक्शन डिव्हाइस यांसारख्या सुरक्षा सुविधांची तरतूद करण्यात आली आहे. लिफ्टच्या तपासणीचे अहवाल नोंदवून ते विद्युत निरीक्षकांकडे सादर करणेही आवश्यक असणार आहे.

याशिवाय, १२ वर्षांखालील मुलांना पालक किंवा प्रौढ व्यक्तीच्या देखरेखीशिवाय लिफ्ट अथवा एस्केलेटर वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. लिफ्ट ऑपरेटरचे किमान वय १८ वर्षे असणे आवश्यक असून, लिफ्ट दुर्घटनेत पीडितांना नुकसानभरपाई मिळण्याची तरतूदही नव्या नियमावलीत करण्यात आली आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना आमदार सत्यजीत तांबे यांनी मात्र केवळ सोसायटी व्यवस्थापनावर सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी टाकून चालणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. लिफ्ट तपासणीसाठी शासनाने ५१९ पदे निर्माण करण्याचे आश्वासन विधिमंडळात दिले होते. मात्र आठ महिने उलटूनही यापैकी किती पदे भरली गेली, याबाबत शासनाने अद्याप स्पष्ट माहिती दिलेली नाही. कायदा आणि नियम लागू झाले असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेली सक्षम शासकीय यंत्रणा उभारणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच तंत्रज्ञानात वेगाने बदल होत असल्याने लिफ्ट परवान्याची २० वर्षांची मुदत कमी करण्याची



गरज त्यांनी व्यक्त केली आहे. दर चार ते पाच वर्षांनी लिफ्टची तपासणी करून नवीन सुरक्षा प्रमाणपत्र देणे बंधनकारक करावे, अशी मागणीही त्यांनी केली. यासोबतच लिफ्ट उत्पादित करणाऱ्या स्थानिक कंपन्यांच्या उत्पादनांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर नियमावली तयार करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

लिफ्टचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे केवळ नियमावली तयार करून न थांबता नियमित तपासणी, तांत्रिक देखरेख आणि पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीविताची सुरक्षितता लक्षात घेऊन शासनाने या सर्व बाबींवर तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका आमदार सत्यजीत तांबे यांनी मांडली आहे.

गोवंश कत्तलीवर पोलिसांचा छापा

१३०० किलो गोमांस, दोन गायी व वासरांसह रिक्षा ताब्यात

संगमनेर (प्रतिनिधी) : संगमनेर शहरातील मदिनानगर परिसरात सुरू असलेल्या गोवंश कत्तलीच्या प्रकारावर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या पथकाने धडक कारवाई केली. मंगळवारी (दि. १७ नोव्हेंबर) सकाळी टाकलेल्या छाप्यात तब्बल १३०० किलो गोवंशाचे मांस, दोन गायी, एक गोऱ्हा आणि तीनचाकी रिक्षा असा एकूण ३ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

संगमनेर शहरातील मदिनानगर, गल्ली क्रमांक दोन येथील मतीन बशीर कुरेशी याच्या पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी साठवून ठेवले जात असल्याची खात्रीशीर माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने मंगळवारी सकाळी ९.१५ ते १०.१५ या वेळेत संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईदरम्यान मतीन बशीर कुरेशी (वय १८, रा. खाटीक गल्ली, संगमनेर) आणि युनुस शब्बीर शेख (वय ४०, रा. संगमनेर खुर्द, मूळ रा. भोजडे, ता. कोपरगाव) हे दोघे गोवंश कत्तलीशी संबंधित असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्रात गोवंश कत्तलीस कायद्याने मनाई असतानाही जनावरांची कत्तल करून मांस विक्रीसाठी साठवून ठेवल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

पोलिसांनी मतीन कुरेशी याच्या ताब्यातून एमएच १६ जे ८०४५ क्रमांकाची काळ्या रंगाची तीनचाकी रिक्षा, ३०० किलो व ५०० किलो असे एकूण ८०० किलो गोवंशाचे मांस, एक जिवंत तांबड्या-पांढऱ्या रंगाची गाय आणि एक काळ्या-पांढऱ्या रंगाचा लहान गोऱ्हा जप्त केला. तर दुसरा संशयित युनुस शेख याच्या ताब्यातून ५०० किलो गोवंशाचे मांस आणि एक काळ्या-पांढऱ्या रंगाची गाय ताब्यात घेण्यात आली. अशा प्रकारे एकूण १३०० किलो मांसासह जनावरे व वाहन असा ३ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०९५/२०२६ आणि १०९६/२०२६ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भारतीय न्याय संहितेच्या कलम २०१, ३२५ तसेच महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९४ (सुधारित २०१५) मधील कलम ५, ५(क), ९, ९(अ) आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३ व ११ अन्वये पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

दाऊद इब्राहिमच्या घरावर 'बाएमसी' चा हातोडा

मुंबई (वृत्तसंस्था)

बीएमसी मुंबईच्या भिंडी बाजारमधील अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमची वडिलोपार्जित इमारत १८ आणि १९ नोव्हेंबर रोजी पाडणार आहे. हाजी इस्माईल हबीब मुसाफिरखाना नावाची ही जवळपास ८० वर्षे जुनी इमारत अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे. सुरक्षेचा विचार करून आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ही इमारत पाडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त असेलपाकमोडिया स्ट्रीट आणि सेकंड कूपर स्ट्रीटवर असलेली ही इमारत दाऊद इब्राहिमचे वडिलोपार्जित घर असल्याचे मानले जाते. असे म्हटले जाते की, १९८६ मध्ये भारत सोडण्यापूर्वी दाऊद आणि त्याचे कुटुंब येथे राहत होते. त्याचे निवासस्थान आणि कार्यालयही याच इमारतीत होते. असा दावा केला जातो की, १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांच्या कटाशी संबंधित घडामोडीही याच संकुलात घडल्या होत्या.

बीएमसीच्या 'सी' वॉर्डने १६ नोव्हेंबर २०२६ रोजी, ही इमारत 'सी-१' श्रेणीतील अत्यंत जीर्ण आणि धोकादायक असल्याचे घोषित करणारी नोटीस बजावली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या ३१ ऑगस्ट २०२० रोजीच्या आदेशानुसार ही इमारत पाडण्यात येत आहे. या इमारतीमुळे सेकंड कूपर स्ट्रीट रस्ता रुंदीकरण प्रकल्पातही अडथळा निर्माण होत आहे.या पाडकामामुळे स्थानिक रहिवासी आणि प्रशासन यांच्यात वाद निर्माण झाला आहे. काही व्यक्ती आणि ट्रस्टचा दावा आहे की, ही मालमत्ता वक्फ बोर्डाची असून वक्फ न्यायाधिकरणाने पाडकामास मनाई केली आहे. त्यांचा आरोप आहे की, मुंबई बीएमसीने आवश्यक असलेल्या १५ दिवसांऐवजी केवळ २४ तासांची नोटीस दिली. असे असूनही, बीएमसीने पाडकामाची तयारी सुरूच ठेवली आहे. इमारत जवळजवळ रिकामी आहे, परंतु तळमजल्यावरील प्रार्थना कक्ष अजूनही वापरात आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
(डॉ. जठार)
डॉ. नितीन जठार
एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. कन्सल्टंट फिजिशियन
तज्ज्ञ : खालीचे हृदय रोग टी.बी. व दम्याचे विकार
डॉ.सौ. उज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. कन्सल्टंट पेडियाट्रिशियन
तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इन्टेन्च्युअर बेबी केअर
अत्याधुनिक कॅथलॅब
(Cath Lab)
शुभ दिपावली
दिवावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

ठुरुनि
ऐक्सक्लुझिव्ह मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग
डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अॅम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25